**Electronic Interdisciplinary International Research Journal (EIIRJ)**
A Peer Reviewed Interdisciplinary Journal UGC Approved Journal No 48833
Impact Factor 5.20 ISSN 2277-8721

# उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुदेशन गरजांचा तुलनात्मक अभ्यास

**दिपक प्रभाकर बाविस्कर (सहाय्यक प्राध्यापक)**
*आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.*

***सारांश :***
*प्रस्तुत संशोधन पेपरांमध्ये नंदुरबार शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विदयार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा अभ्यास सर्वेक्षण पध्दतीने केला आहे. सहेतूक नमुना निवड पद्धतीने ९० विद्यार्थ्याची न्यादर्श म्हणुन निवड केली. विद्यार्थ्यांचा समुपदेशन गरजांचा अभ्यासासाठी डॉ. विजयालक्ष्मी चौव्हान (उदयपूर) आणि सौ. गुंजन अरोरा (अहमदाबाद) यांनी प्रमाणित केलेली Psychological Counselling Needs Scale या कसोटीचा वापर केला आहे. मध्यमान, प्रमाणविचनल व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर माहिती विश्लेषणासाठी केला. प्रस्तुत संशोधनातून उच्च माध्यमिक शाळेतील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विदयार्थ्यांचा समुपदेशन गरजा समान दिसून येतात.*

**महत्त्वपूर्ण संज्ञा-** कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी, मानसशास्त्रीय समुपदेशन.

**प्रस्तावना-**

मॅक्लिन यांच्यामतानूसार - "जी व्यक्ती स्वतःच स्वतःचे प्रश्न/समस्या सोडवू शकत नाही अशी व्यक्ती आणि तज्ज्ञ, प्रशिक्षित व्यावसायिक समुपदेशक की जो अनेकविध स्वरूपाच्या व्यक्तिगत समस्या अडचणी सोडविण्यासाठी मदत करू शकतो. अशा व्यक्तीमधील एकास एक किंवा समोरासमोर परस्परसंबंध घडवून आणणरी प्रक्रिया म्हणजे समुपदेशन होय". समुदेशन केवळ खुप गरज आहे म्हणूनच दिले जाते असे नाही. या अवस्थेतील मुलांना आरोग्याविषयी, स्वतःच्या क्षमतांविषयी, स्वतःच्या करिअर विषयीही वेळोवेळी समुदेशनाची गरज भासत असते. ज्ञानातुन सक्षमता मिळविणे हा महत्त्वाचा भाग असल्यामुळे विद्यार्थ्यांला हे ज्ञान प्राप्त होणे महत्त्वाचे आहे. उच्चमाध्यमिक शिक्षणाचा काळ हा विद्यार्थी जीवनाचा करिअर घडविण्याचा काळ असल्यामुळे विद्यार्थ्यांना या काळात मार्गदर्शन करण्याची खूप गरज असते. काहीवेळेस वयोमानानुसार, मित्राच्यानुसार विद्यार्थी निर्णय घेत असतात. अशा काळात विद्यार्थ्यांना गरज असते ती सामाजिक, मानसिक आणि भावनिक स्तरावर मार्गदर्शन करण्याची गरज असते. पालक शिक्षक आणि सहपाठी याव्दारे जे समुपदेशन होणार असते ती महत्त्व असते. हा काळ नियोजनाचा, गरजा समजून घेण्याचा आणि आपल्या उर्जाचे नियोजन करण्याचा असल्यामुळे समुपदेशन होणे महत्त्वाचे आहे. काही विद्यार्थी घरातील आर्थिक परिस्थिती, पालकांमधील भांडण, भेदभाव आणि शिक्षणातील कठिण संकल्पना समजून घेण्यात येणाऱ्या अडचणी यामुळे अनेक अडचणी निर्माण होत असतात. अशा अनेक बाबींमध्ये विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन होण्याबरोबरच समुपदेशन गरजा समजून घेणे आजच्या काळात

महत्त्वाचे आहे. म्हणूनच उच्चमाध्यमिक शालेय जीवनात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजा समजून त्यांना समुपदेशन केले जात असल्यास त्यांच्या जीवनाला एक अनुकूल आणि विकासात्मक वळण लागेल. प्रस्तुत संशोधनात उच्चमाध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना समुदेशन गरजांचा अभ्यास केला आहे.

**समस्या विधान :**

नंदुरबार शहरातील उच्चमाध्यमिक शाळेतील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दिष्टे :**

१) उच्चमाध्यमिक शाळेतील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा अभ्यास करणे.

२) उच्चमाध्यमिक शाळेतील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा अभ्यास करणे.

३) उच्चमाध्यमिक शाळेतील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा अभ्यास करणे.

**परिकल्पना :**

१) उच्चमाध्यमिक शाळेतील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

२) उच्चमाध्यमिक शाळेतील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

३) उच्चमाध्यमिक शाळेतील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

**पध्दती:** प्रस्तुत संशोधनात नंदुरबार शहरातील उच्चमाध्यमिक शाळेतील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समूपदेशन गरजांचा विषयी सद्यस्थिती जाणून घ्यावयाची असल्याने आणि ती माहिती प्रश्नावलीव्दारे संकलित असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या व न्यादर्श :** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने जनसंख्या म्हणुन नंदुरबार शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील १२ वी वर्गाच्या कला, विज्ञान व वाणिज्य शाखेत अध्ययन करणारे सर्व मुले व मुली ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चित केली. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सहेतूक नमुना निवड या पद्धतीने नंदुरबार शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील कला (३०), विज्ञान (३०) व वाणिज्य (३०) अशा तिन्ही शाखेतील एकूण ९० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.


**संशोधनाची साधने:** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने नंदुरबार शहरातील उच्चमाध्यमिक शाळेतील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा समुपदेशन गरजांचा अभ्यासासाठी डॉ. विजयालक्ष्मी चौव्हान (उदयपूर) आणि सौ. गुंजन

अरोरा (अहमदाबाद) यांनी प्रमाणित केलेली Psychological Counselling Needs Scale या कसोटीचा वापर केला आहे. या कसोटीत/प्रश्नावलीत एकुण २५ प्रश्न आहेत.

**माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ**: डॉ. विजयालक्ष्मी चौव्हान (उदयपूर) आणि सौ. गुंजन अरोरा (अहमदाबाद) यांनी प्रमाणित केलेली Psychological Counselling Needs Scale या कसोटीच्या साहाय्याने उच्च माध्यमिक शाळेतील विदयार्थ्याकडून माहिती संकलित करून, विदयार्थ्यांनी नोंदवून दिलेला प्रतिसादाचे विश्लेषण करून संशोधन पेपरात मांडण्यात आलेल्या शुन्य परिकल्पनाचे परीक्षण करण्यात आले.

**आलेख क्रमांक ०१**

**कला विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचे मध्यमान दर्शविणारा आलेख**




**परिकल्पना पडताळणी परीक्षण**

**परिकल्पना क्रं. ०१ :** उच्चमाध्यमिक शाळेतील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

| शाखा | संख्या N | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | नमुना 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | त्याग/ स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| कला | ३० | ६६.९९ | ६.१२ | २.०० | १.५९ | स्वीकार |
| विज्ञान | ३० | ६४.३३ | ६.७८ | | | |

स्वाधीनता मात्रा (df) = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't'मूल्य १.५९ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की,

उच्चमाध्यमिक शाळेतील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, उच्चमाध्यमिक शाळेतील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना समुदेशन गरजांमध्ये फरक नाही.

**परिकल्पना क्रं. ०२ :** उच्चमाध्यमिक शाळेतील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

| शाखा | संख्या N | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | नमुना 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | त्याग/ स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| कला | ३० | ६६.९९ | ६.१२ | २.०० | ०.५१ | स्वीकार |
| वाणिज्य | ३० | ६६.२१ | ५.६८ | | | |

स्वाधीनता मात्रा (df) = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य ०.५१ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, उच्चमाध्यमिक शाळेतील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, उच्चमाध्यमिक शाळेतील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना समुदेशन गरजांमध्ये फरक नाही.

**परिकल्पना क्रं. ०३ :** उच्चमाध्यमिक शाळेतील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

| शाखा | संख्या N | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | नमुना 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | त्याग/ स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| विज्ञान | ३० | ६४.३३ | ६.७८ | २.०० | १.१६ | स्वीकार |
| वाणिज्य | ३० | ६६.२१ | ५.६८ | | | |

स्वाधीनता मात्रा (df) = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't'मूल्य १.१६ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, उच्चमाध्यमिक शाळेतील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, उच्चमाध्यमिक शाळेतील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना समुदेशन गरजांमध्ये फरक नाही

**निष्कर्ष :**

१. उच्चमाध्यमिक शाळेतील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

२. उच्चमाध्यमिक शाळेतील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

३. उच्चमाध्यमिक शाळेतील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणांकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.

**चर्चा :** प्रस्तुत संशोधनातील वरील निष्कर्ष पाहता लक्षात येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी जरी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेत असले तरी त्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांमध्ये फरक नाही. परंतु शिक्षकांनी लक्षात घेणे गरजेचे आहे की, विद्यार्थ्यांना, शालेय जीवनात मानसिक, भावनिक आणि सामाजिक स्तरावरील समायोजनासाठी त्याच्या गरजा समुजन घेणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्यांच्या दैनंदीन जीवनातील गरजा, व्यायाम, अभ्यासाच्या सवयी, त्यांच्या करिअर विषयीचा दृष्टिकोन लक्षात घेणे महत्त्वाचे असल्यामुळे त्याना मार्गदर्शन आणि समुपदेशन होणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :**

Chauhan, S.S. (1999). Advanced Educational Psychology, Vikas Publishing House, New Delhi.

Kothari, C.R. (1990) Research Methodology, Methods and Techniques, New Delhi: Wiley Eastern Limited.

पंडीत बन्सी बिहारी , शैक्षणिक संशोधन,(संख्यात्मक/गुणात्मक), पुणे: नित्य नुतन प्रकाशन.

पंडीत, र.वी. (२००६) शैक्षणिक मानसशास्त्र, नागपुर: पिंपळापुरे कं. पब्लिशर्स.

मुळे रा.श. आणि उमाठे, वि. तु. (१९८७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (द्वितीय आवृत्ती),विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

हिरवे व तडसरे (२०११) समुपदेशन मानसशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

दुनाखे, अरविंद (२००५) शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे: नित्य नुतन प्रकाशन.

कदम चा.प. (१९९७) शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : श्री विद्या प्रकाशन.